महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्या.,
प्रकाशगड, ४ था मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

ई. मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं. :- ०२२ -२६५८०६४२
वेब साईट : www.mahadiscom.in

क्र. मासं/मु.म.व्य (मासं-तांआ)/मपुक/नाप/ 008419 दिनांक : 31 MAR 2012

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
नाशिक परिमंडल,
नाशिक.

विषय : कळवण विभागामध्ये कनिष्ठ व्यवस्थापक (मासं) यांचे नविन पद मंजूर करण्याचा प्रस्ताव.

संदर्भ : आपले पत्र क्रं. मुअ/नाप/साप्रवि/२८४ दि.१७/०१/२०१२.

*******

नाशिक परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कळवण विभागाच्या आस्थापनेवर कनिष्ठ व्यवस्थापक (मासं) हे पद नव्याने निर्माण करण्याबाबतचा संदर्भातील पत्राद्वारे केलेला प्रस्ताव प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) नाशिक परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील तत्कालीन सटाणा विभागाचे विभाजन करुन कार्यालयीन आदेश क्रमांक - २० (साप्रवि/मपुक/२४४३७) दि. २२/०७/२००९ अन्वये कळवण येथे नवीन विभागीय कार्यालय निर्मिती करण्यास मंजूरी देतेवेळी मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

" It appears that it does not fit into Norms. As it is a tribal and backward area let us try for 3 months. In the meantime monitor collection, loss reduction & consumer service. We will review it then".

सदर आदेश निर्गमनानंतर कार्यालयीन पत्र क्रं. साप्रवि/मुमव्य(तां.आ)/मपुक/२४९९१/११३ दि.२८/०७/२००९ अन्वये काही बार्बीची विचारणा केलेली आहे. तथापि, त्याबाबतची माहिती आपल्या कार्यालयाकडून आजतागायत सादर झाल्याचे आढळून येत नाही. तत्काळ संदर्भास्तव सदर पत्राची प्रत सोबत पाठवित आहे.

त्यानुसार कळवण विभागाच्या मागील तीन वर्षाच्या महसूलामध्ये झालेली वाढ दर्शविणारा तक्ता, कमी करण्यात आलेले वीज गळतीचे प्रमाण व टक्केवारी तसेच ग्राहकांना दिल्या जाणा-या सेवेमध्ये झालेली गुणवत्तापुर्व वाढ याबाबतचा अहवाल / माहिती त्वरित सादर करावी.

२) सटाणा विभागाकडे विभाजनापुर्वी आपल्या कार्यालयाने कळविल्यानुसार १,०२,००० ग्राहक होते. विभाजनानंतर सटाणा विभागाकडे ५५,००० वीजग्राहक व कळवण विभागाकडे ४७,००० त्यावेळी होते. संदर्भातील पत्राद्वारे आपण कळवण विभागाची आजमितीची वीजग्राहकांची संख्या कळविलेली नाही. तथापि, मागील तीन वर्षामध्ये कळवण विभागाच्या वीजग्राहकांमध्ये दरवर्षी कमाल १०% वाढ झाली असे गृहीत धरले तरी आजमितीस या विभागाकडे ६०,००० पेक्षा जास्त वीजग्राहक असू शकत नाहीत.

कार्यालयीन आदेश क्रमांक मपुक-२९(साप्रवि/मुमव्य(तां.आ)/मपुक/३३९४० दि.०४/११/२०१०) अन्वये प्रसुत केलेल्या सुधारीत मानंकानुसार कोणत्याही ग्रामिण विभागाकरीता किमान ३०,००० ग्राहकसंख्या असणारे ४ उपविभाग असणे आवश्यक आहे म्हणजेच ग्रामिण विभागाकरीता किमान १,२०,००० वीजग्राहक संख्या असणे आवश्यक आहे.

कळवण विभागाकडे किमान आवश्यक ग्राहक संख्येपेक्षा आजची वीजग्राहक संख्या खुपच कमी असल्यामुळे हा विभाग मानंकाधीन नाही.

३) या कारंणामुळे व मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या शे-याच्या अनुषंगाने कळवण विभागाच्या निर्मितीचे पुर्नविलोकन करणे अत्यंत गरजेचे आहे.

४) वरील सर्व बाबी विचारात घेऊन कळवण विभागाच्या निर्मितीपासून आजपर्यतच्या कार्यकाळातील सर्व कार्याचा सर्वकष आढावा घेण्यात यावा व सदर विभाग या पुढेही चालू ठेवावयाचा असल्यास तपशिलवार समर्थनासह तसा प्रस्ताव या कार्यालयास दि. १६/०४/२०१२ पुर्वी प्रादेशिक कार्यकारी संचालक -२, पुणे यांच्या कार्यालयामार्फत त्यांच्या शिफारशीसह सादर करण्यात यावा.

५) अन्यथा, कळवण विभाग चालविण्याकरीता येणारा वार्षिक आर्थिक बोजा व त्या विभागातून मिळणारा वार्षिक महसूल यांची तुलनात्मक पडताळणी करुन हा विभाग मानंकाधीन नसल्यामुळे यापुढे चालु ठेवणे किफायतशीर नसले तर त्या दृष्टीकोनातून विचार करुन पर्यायी व्यवस्थेचा प्रस्ताव या कार्यालयास दि. १६/०४/२०१२ पुर्वी कार्यकारी संचालक - २, पुणे यांच्या कार्यालयामार्फत त्यांच्या शिफारशीसह सादर करण्यात यावा.

सोबत :वरीलप्रमाणे

*(प्रदिप मा. माटे)*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं-तांआ)*

***प्रत सविनय सादर :***
प्रादेशिक कार्यकारी संचालक - २, म.रा.वि.वि.कं.मर्या, पुणे

D:\Sheetal\ New Marathi Letter 2011.doc 28/03/2012

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई. मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं. :- ०२२ -२६५८०६४२

तांत्रिक आस्थापना विभाग
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्या.,
प्रकाशगड, ४ था मजला,
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

क्रमांक :ताप्रवि/मु.म.व्य./म.पु.क/२४९९१/ 992

दिनांक : २८.७.२००९

गोपनीय

प्रति,
मुख्य अभियंता ,
म. रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
नाशिक परिमंडल,
नाशिक.

विषय : कळवण येथे महावितरण कंपनीचे विभागीय कार्यालय निर्माण करणेबाबत.
संदर्भ आपले पत्र क्रमांक मु.अ./नाप/साप्रवि/३९७९ दिनांक १६.०७.२००९.

***

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी कळवण येथे विभागीय कार्यालय निर्माण करण्यासाठी मंजूरी दिली आहे. त्याप्रमाणे या कार्यालयाकडील का.आ.क्र.२० दिनांक २२.७.२००९ अन्वये कार्यालय मंजूरीचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि सदर कार्यालयाच्या मंजूरी संबंधात व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१) कळवण विभागाचे कार्यक्षेत्र आदिवासी व मागासलेला भाग असल्यामुळे ह्याच्या विकासासाठी चालना मिळण्याच्या उद्देशाने विशेष बाब म्हणून कळवण विभागीय कार्यालय निर्माण केले आहे.

२) सटाणा व कळवण ह्या विभागीय कार्यालयाच्या निर्मितीपासून कंपनीला मिळणारा महसूल, वीज गळती थांबल्यामुळे होणारा फायदा, व ग्राहक सेवा याचा संपूर्ण अहवाल अभिप्रायासह दर महिन्याला या कार्यालयाकडे सादर करावा.

३) सद्यस्थितीत कळवण विभागाच्या कामकाजासाठी सटाणा विभागातील तसेच इतर ठिकाणचा कर्मचारीवृंद वळविण्यात यावा.

४) कार्यकारी अभियंत्याच्या नेमणूकीचे आदेश वेगळे जारी करण्यात येत आहेत.

व्यवस्थापकीय संचालक यांच्या उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बाबत या द्वारे आपणांस कळविण्यात येत आहे.

मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)

प्रत आदरपूर्वक सादर :१. क्षेत्रीय कार्यकारी संचालक-२, पुणे.
२. कार्यकारी संचालक (मां.सं.)

C:Document and Settings\MPR\Desktop\2009\Letter Marathi.doc\28.07.09